**व्याख्यान २**

दिनांक : १५. ८. २००४

चाळीस/पंचेचाळीस सालापर्यंत गाणी किती होत होती? गाणारे किती होते? गाणी कोण करीत होते? असे प्रश्न आपण आपल्याला विचारले तर फार वेगळं उत्तर द्यावं लागेल. त्यावेळी गाणी होत होती ती गणपती उत्सवात - तीही सहा दिवस. दोन दिवस गणपती बसविण्यात जायचे, दोन दिवस गणपती उतरविण्यात. त्यामुळे सहा दिवस गाणी होत. एका वेळी चार-सहा ठिकाणी गाण्याचे कार्यक्रम असत. हे गाण्याच्या कार्यक्रमाचं पुण्याचं स्वरूप होतं आणि आहे. मुंबईलाही गाणी होत असत पण गाणं ऐकणारा वर्ग तयार झालेला नव्हता. पुण्यामधे गाणं ऐकणारा वर्ग तयार झालेला होता. याशिवाय त्या काळी कॉलेजच्या वसतिगृहाचं वर्षातून एकदा स्नेहसंमेलन व्हायचं. विशेषतः फर्गसनमधे सोलापूर क्लब म्हणून होता, त्यांच्या क्लबतर्फे गाणं व्हायचं. मोठ्या गायकांची गाणी व्हायची. रामभाऊ कुंदगोळकर, अब्दुल करीम खाँसाहेबांचीही दोन गाणी झाल्याचा उल्लेख आहे. त्यांना बिदागी किती मिळायची? ऐंशी रुपये. त्यांच्या खालच्या गायकांना किती बिदागी मिळत असेल त्यांचा अंदाज आपल्याला येईल. त्यावेळी बाई सुंदराबाई नावाच्या गायिकेला पाच हजार रुपये देऊन लोक बोलवत होते. तेही मुंबईसारख्या, इंदौरसारख्या ठिकाणी. संस्थानिकांच्या घरच्या लग्नात, श्रीमंत लोकांच्या विवाहप्रसंगी गाणं करण्याचा प्रघात होता. म्युझिक सर्कल्स रखडत रखडत चाललेली होती. पुण्याचं 'पूना म्युझिक सर्कल' हे थोडं नामांकित होतं, त्याच्यातर्फे गाणी व्हायची पण महाराष्ट्रातलेच गवई गायचे. आंतरप्रांतीय आदान-प्रदान, तीन-चार टक्केदेखील नव्हतं. अशा काळामधे मी सोलापुरलाही दोन महत्त्वाची गाणी ऐकली. जुन्या गिरणीचे मालक मोरारका म्हणून होते. त्यांच्या मुलाच्या लग्नामधे केसरबाई केरकर यांचं गाणं झालं. त्या लोकांना गाण्यातलं काही कळत होतं अशातला भाग नाही. पण पैसा होता, लोकांना गाणं ऐकायला बोलवायची हौस होती. ते एखाद्या रसिक जाणकाराला विचारत, 'कोई अच्छा गानेवाली है क्या ?' ते सांगायचे 'बम्बई में केसरबाई केरकर नाम की बहोत बडी गायिका है'. 'कितने पैसे चाहिये?' असं करत गाणं ठरवलं जायचं. अशाच एका लग्नात केसरबाईंचं गाणं मी आयुष्यात पहिल्यांदा ऐकलं. मारवाड्यांकडचं लग्न हे इतरांच्या लग्नापेक्षा वेगळं असतं. ते बाराती, त्यांची बडदास्त, न्हावी, धोबी, मालीश करणारे असं सारं असायचं, ती त्यांची स्टाईल होती. त्यातून हे श्रीमंत मारवाड्याकडचं लग्न. आम्हीही गाण्याला होतोच. बोलावलेलं नव्हतं. गाणं ऐकायला मिळावं, गायकांशी - कलाकारांशी परिचय वाढावा यासाठी मी थोडे श्रीमंत मित्रही जोडले होते. केसरबाईंच्या त्या गाण्यात मला आजही एक महत्त्वाची गोष्ट आठवते. केसरबाई तंबोरे लावून गायला बाहेर आल्या. त्यावेळी ती मारवाडी मंडळी, पाय लांब करून, तक्याला टेकून लोळत गाणं ऐकण्याच्या तयारीत होती. बाईंनी ते पाहिलं, त्या भडकल्या. त्यांनी ओरडून सांगितलं, ''कोण आहे रे तिकडे, या सगळ्यांना नीट बसायला सांगा, नाही तर बाहेर जायला सांगा. तुम्ही काय नायकिणीचं गाणं ऐकायला आलेले आहात काय?'' त्या लोकांचा थरकाप उडाला. व्याह्याकडच्यांना काय सांगायचं? बाईंनी सांगितलं. 'तुमचे पैसे मला नकोत, तुमची बिदागी तुमच्या तोंडावर फेकून मी चालले.' त्यानंतर आम्हा वीस-पंचवीस मंडळींपुढे बाईंचं गाणं झालं. पुढे केसरबाईंच्या बारा-पंधरा मैफली मी ऐकल्या. मुंबईलाही त्यांचं गाणं ऐकायला जायला लागलो. तालमकी वाडी म्हणून जी वाडी होती तिथं वर्षाला एक-दोन गाणी व्हायची. त्या बाईंच्या अहंकाराचा थोडा भाग असेल पण गाणं ऐकायला कोण बसतंय, ते कसे आहेत याचा एक अंदाज त्या घेत. गाणं सुरू झालं की, समोर बसलेले सामान्य श्रोते, आमच्यासारखे रसिक, आम्हांला 'वाहवा' म्हणण्याची परवानगी नव्हती. एक झाबवाला नावाचे वकील होते, भगवे कपडे घालून ते समोर बसायचे. फक्त त्यांनाच वाहवा म्हणण्याचा 'पास' होता. आम्ही सुद्धा हात बांधून गाणं ऐकायचो. एव्हाना मला गाणं कळायला लागलं होतं. गाणं ऐकण्यात मी तरुण झालो होतो. बालपण संपलेलं होतं. तालमकी वाडीतलं पहिलं गाणं ऐकलं त्यावेळी मला गाणं कळत असून त्यांचं गाणं काहीच कळलं नाही. ती रागाची मांडणी ते आलाप-कळलंच नाही. पण एक गोष्ट मात्र मनावर पक्की ठसली की, गाण्याच्या भाषेत शुद्ध मुद्रा आणि शुद्ध बानी याचा आदर्श म्हणजे केसरबाई केरकर होत्या. त्याच्यानंतरचं दुसरं उदाहरण अलीकडचं, म्हणजे दिल्लीचे जगदीशप्रसाद. केसरबाईंच्या गाण्याला यशवंत केरकर म्हणून ठेका धरणारा होता. तो बाईंना ऐकू येईल एवढाच ठेका वाजवायचा. सारंगीची साथ मजीदखाँ म्हणून सारंगिये करायचे, तेही बाईंना ऐकू जाईल अशा बेतानं वाजवायचे. केसरबाईंचं गाणं देखणं होतं. गुरूंनी शिकवलेलं गाणं त्या गायच्या. त्यांच्या ताना, त्या तानांचं एक डिझाईन होतं. केसरबाई आणि हिराबाई या दोन मोठ्या गायिकांमुळे गाण्याला वजन आलं. गाण्याचं ते तवायफी रूप गेलं. हुकूमत आणि सुरांचं सच्चेपण आलं. केसरबाईंची मुलगी मेडिकल कॉलेजमधे शिकत होती. त्या कॉलेजचे प्राचार्य म्हणाले, 'आपलं गाणं ठेवतो आहोत, कॉलेजला सहा-सात हजार रुपये मिळतील.' आपण आमच्या कॉलेजमधे गायला या असं सांगण्याऐवजी, त्यांनी कॉलेजला पैसे मिळतील म्हणून गायला या असं सांगितल्यावर केसरबाईंनी त्या प्राचार्यांना - त्यांना गाण्यातलं काहीच कळत नसावं - थांबायला सांगितलं, त्या आत गेल्या आणि त्यांनी पाच हजार रुपयांचं पुडकं आणलं आणि त्यांच्या तोंडावर फेकून त्या म्हणाल्या, 'तुम्हाला पैसे पाहिजे आहेत ना हे घ्या. मी गाणार नाही.' यात त्यांचा नुसता अहंकार नव्हता. आपण हे लक्षात

घ्या, त्यात गाण्याची प्रतिष्ठा आहे. गाण्याला प्रतिष्ठा देणं हे कलावंताचं काम आहे. केसरबाईंविषयी बोलण्यासारखं खूप आहे. विषयाच्या विस्ताराच्या दृष्टीने ते शक्य होणार नाही. केसरबाई कधी ठुमरी गायल्या नाहीत - फक्त भैरवी ठुमरी गायच्या. या आधी मुंबईतल्या तालमकी वाडीतल्या गाण्याचा जो मी उल्लेख केला त्यात सकाळी नऊ पासून ते एक-दीड वाजेपर्यंत त्या गायल्या. एकच राग, त्याची वेगळी वेगळी रूपं - आम्हांला कुठलं कळतंय - एक बिलावल राग अलहिया बिलावल, कुकुभ बिलावल, यमनी बिलावल. यात काही विचारायची सोय नाही. एका गृहस्थानं धाडस करून विचारलं 'हा कुठला राग?' बाई उत्तरल्या. 'तुम्हाला माहीत नाही ना! मग मी सांगून काय उपयोग आहे. अशी नावं सांगत बसले तर त्यातच वेळ जाईल. हजर असलेल्यांतल्या निम्म्या लोकांना माझे राग कळत नाहीत.' त्यांचे गुरुजी अवघडदास - अल्लादियाखाँ. तर असा सारा तो काळ होता. या काळातून आम्ही जात होतो.

यात आपल्याला एक सांगायचं राहिलं, ते सांगतो. शोभा गुर्टूची आई, मेनका शिरोडकर त्यांचं नाव - नुकत्याच त्या वारल्या. काय बाई होती हो. मला असं सारखं वाटतं की ही बाई अवेळी जन्मली. तिचा जन्मायचा आणि परफॉर्मन्सचा काळ चुकला. अशी बाई हिंदुस्थानात एकच असं मी म्हणत नाही. कारण कलकत्त्यातही अशी एक बाई होती. तिचं नाव गोहरजान. ती उभं राहून हावभाव करून गायची. मेनकाबाई शिरोडकर गुडघ्यावर बसून निम्मं उठत हावभाव करीत गाणं म्हणत असत. साभिनय गाणं - गाण्यात त्याला अदा असं नाव आहे. अदाकारीयुक्त गाणं. त्या बाईची तीन चार गाणी मी ऐकलेली आहेत. त्यांतलं पहिलं गाणं त्या मोरारकाच्याकडे सोलापुरला ऐकलं. काय होतं ते गाणं - गाण्याचं म्हणाल तर ते गाणं फार उच्च प्रतीचं होतं असं मी म्हणणार नाही. त्यावेळी मला ते आवडलं होतं. एक जाता जाता सांगतो, एखादा गायक आवडणं न आवडणं याचं स्वातंत्र्य रसिकांना असलं पाहिजे, म्हणजे मला आवडतंय म्हणून इतरांना आवडलं पाहिजे हे बरोबर नाही. - तर ती बाई गायची (गातात) 'गोकुळच्या चोरा - अरे गोकुळच्या चोरा लोणी नको खाऊ रे, लोणी नको - इथं ती सम यायची. त्यानंतर पुढची भाषा ही अभिनयाची असायची. 'गोकुळच्या चोरा' हे परत आलं की ती स्टान्स घ्यायची. नर्तक घेतात ना तसा. आमदमधे नर्तक घेतात तसा आणि अभिनय किती प्रकारचा? चेहेऱ्याचा अभिनय, हाताचा तर मोठाच, मांडीवर निम्मं उभी राहूनचा अभिनय. त्या सगळ्यात एक अदाकारी, आवाहन, बोलावणं, सांगणं हे सगळं करताना शृंगाराचा कोठेही अतिरेक होऊ न देणं हे मोठे गुण मेनकाबाई शिरोडकरमधे होते. यांतल्या नव्वद टक्के बायका या गोव्याच्या. या गोव्याच्या गायिका ज्या नंतर मुंबईमधे येऊन स्थायिक झाल्या - त्यांनी मन लावून गायकी घेतली, त्यामुळेच हिंदुस्थानी संगीत हे पुढे गेलं असं आपल्याला दिसून येईल. त्या सगळ्या कोणत्यातरी गावाचं नाव लावायच्या. कुणीतरी एक शेठ असायचा. त्याच्याशी गांधर्व विवाह - हाच त्याला शब्द होता - करून त्या राहिल्या, वाढल्या. त्यांनी कलेला योगदान दिलं - यात काही चूक आहे असं मला वाटत नाही. केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर - केरी म्हणून केरकर, कुर्डी म्हणून कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर - सोलापुरची सून - थोडं विषयांतर करून सांगतो, गांधी नावाचे तिचे यजमान होते. नेहरूही या गांधी सावकाराकडे उतरत. हरिभाई देवकरण या नावाची त्यांची पेढी होती. एकोणीसशे सदतीस साली या गांधी सावकाराकडे कॅश अठ्ठ्याण्णव लाख रुपये होते. यावरून आपल्याला त्यांच्या श्रीमंतीची कल्पना येईल. पेशवाईच्या शेवटच्या काळात पेशव्यांनी त्यांचेकडील भरीव असा सोन्याचा गणपती गहाण ठेवून त्यांचेकडून पैसे घेतले होते, असा इतिहास आहे. अशांपैकी एका गांधीशी हिराबाईंचा विवाह झाला, म्हणून मी सोलापुरच्या सूनबाई म्हणतो. वहीदखाँसाहेबांकडून शिकून गावोगावी जाऊन आपल्या चिजा मांडून त्यांनी आपलं गाणं पुढे नेलं. हिराबाईंच्या गाण्याचं मला कौतुक वाटतं. नवे राग आले रे आले, - काही राग असे मधेच यायचे - नवे राग आले की, हिराबाई त्याचा तुकडा गायला लागायच्या. त्या गायला लागल्या की माणिक वर्मा गायला लागायची, माणिक गायला लागली की, मालती पांडे गायला लागायची. हिराबाईंना कित्येकदा अंतरा माहीत नसायचा मग आप्पा जळगावकर पेटी वाजवता, वाजवता कानात अंतरा सांगायचे. असा या गाण्याच्या प्रवाहातला सांधा आपल्याला सांगतो. ही गाणी ऐकताना मोगुबाई कुर्डीकरांचा परिचय झाला. घरात जाणं येणं सुरू झालं. किशोरी लहान होती, तिचं गाणं ऐकायला लागलो. मोगूबाई फार कर्मनिष्ठ गायिका होत्या. गाण्यावर देवतासमान प्रेम करणाऱ्या होत्या.

ही गाणी ऐकण्याचा जो काळ होता त्या काळात आम्हांला आधार होता ते मुंबई आकाशवाणीचा. आम्ही त्यावेळी मुख्य गाणं ऐकलं ते आकाशवाणीवर. मुंबई केंद्रावर त्यावेळी, दहा ते साडेदहा, दर पंधरा दिवसांनी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम असत. मोगूबाई, गंगूबाई यांची गाणी व्हायला लागली. निवृत्तीबुवा सरनाईक, नार्वेकर सिस्टर्स, सरस्वती फातरफेकर, मोठ्या विद्वान कलाकारांची गाणी व्हायला लागली. आमचं सगळं गाण्याचं शिक्षण या रेडिओद्वारे होत असे. वझेबुवांचं गाणं देखील मी रेडिओवर ऐकलं. एक त्या वेळची गोष्ट सांगतो. हे लोक गात असायचे, आपल्याच नादात गात. तांबडा दिवा लागला की, गाणं थांबवायचं हे त्यांच्या लक्षातच येत नसे. त्या काळात गाणं आळवत गायलं जायचं. खर्ज लावत आहेत, बेहेलावे चाललेले आहेत. काही घाई नाही. तासभर एक राग गायले - म्हणजे 'तासभर त्यांनी काय पूरिया भरलाय' ही भाषा होती. या सर्व पार्श्वभूमीवर आमच्या आयुष्यात बडे गुलाम अली खाँ आले. ते पाकिस्तानातून मुंबईला राहायला आले होते. हे का घडलं? पाकिस्तानामधे त्यांच्यावर हिंदू चिजा म्हणायला, बंदी आली. 'मंदर देख सुदामा', शंकराचं भजन, ठुमरीत कृष्ण येता कामा नये. त्यामुळे मूळचे पाकिस्तानातले, पतियाळा घराण्याचे तिथले, त्यांनी आपलं चंबूगबाळं उचललं आणि मुंबईला आले. त्याचं म्हणणं होतं मी चिजा बदलणार नाही. बडे गुलाम अली अर्धा तास, चाळीस मिनिटं गायचे. लगेच पुढचा राग, त्यांना कुणीतरी विचारलं इतका कमी वेळ तुम्ही एक राग का गाता? ते म्हणाले, 'खूप वेळ राग गायला तर त्यात पुनरावृत्ती असते. ती आपल्याला कळत नाही. हर राग की एक मूरत होती है, जरा कम तो बहोत कम, जरा ज्यादा तो बहोत ज्यादा' त्या त्या रागाची अेक शक्ती असते आणि लोकांना द्यायचं तेवढंच तुम्ही गायला पाहिजे. हे भान आपल्यापैकी पुष्कळ गायकांना असत नाही.

माझ्या या गाण्याच्या प्रवासात रेकॉर्डस्‌ही यायला लागल्या होत्या. मुंबई रेडिओवर सकाळी साडेबारा ते एक, या दरम्यान रेकॉर्डस् लावायचे. पुष्कळ त्याच त्या होत्या. याबरोबरच मी इतरही गाणं, गायनप्रकार मोकळ्या मनानं ऐकत होतो. त्यातलंच एक माझ्या स्मरणात रुजून राहिलेलं ते म्हणजे - अब्दुल रहिमान काचवाला नावाचा कव्वाल होता. तो मुंबई रेडिओवर गात असे. त्याच्या रेकॉर्डस्‌ही होत्या. काचवाला म्हणजे काय, तो कव्वाली म्हणताना तो काचेवर - काचेच्या पट्ट्यांवर ताल वाजवत असे. मी प्रत्यक्षही कव्वाली ऐकायला जायला लागलो. याच काळात - पंचेचाळीस ते साठ पर्यंत मी निजामपुरकरबुवा यांची कीर्तन ऐकायला जायला लागलो. ते गात गात कीर्तन करत. कोल्हटकर बुवा होते. ही जी कीर्तनकार मंडळी होती. त्यांना कीर्तन आणि गाण्याचं अंग असे जे दोन्ही अविभाज्य भाग होते ते उत्तम अवगत होते. एखादी साकी अगर दिंडी म्हणायची झाली तर त्या साकी वा दिंडीला भूप, बहार या रागांत असं काही बसवलेलं असायचं की २-२ ॥-३ मिनिटं ते चालून समेवर येऊन संपायचं. कीर्तन परंपरेनंही गाण्याला जनमानसात फार मोठं स्थान निर्माण करायला मदत केली. आता हा धार्मिक उपशास्त्रीय गाण्याचा प्रकार जवळजवळ नाहीसा व्हायला लागलेला आहे. धृपद नाहीसं व्हायला लागलं. काही धृपद गाणारे २-३ जण अद्यापही आहेत. हे गाणं ऐकत असतानाच गाणाऱ्यांमध्ये गाणं मांडण्यात वेगळेपणा जो होता, तो माझ्या प्रवासाला अडथळा करणारा होता. पन्नास सालाच्या सुमाराला मुंबईतल्या मुली, उघडपणे गायकांकडे शिकायला जायला लागल्या. हे जे शिकवणारे होते ते नव्वद टक्के आग्रा घराण्याचे होते. त्यांचा एक अड्डाच होता. शिकणाऱ्या मुली या श्रीमंत सारस्वताच्या घरातल्या असत. त्या मुली तंबोरा घेऊन गायला लागल्या. हे मोठेच सामाजिक परिवर्तन होते. मोगूबाई कुर्डीकरांकडे कौसल्या मंजेश्वर म्हणून शिकत होती. खूप मुली गाणं शिकायला लागल्या. ते गाणं शिकत असताना मुलींचा आवाज, गुरूचा आवाज आणि गाण्याचा आवाज, मी हे तिसरं मुद्दाम सांगतो, माझ्या अनुभवानं सांगतो. आवाजाच्या लगावाच्या बाबतीत कित्येक गुरूंना काही कळलं नाही. ते आपल्यासारखं गायला लावत. किराणेवाले अब्दुल करीम यांचा आदर्श ठेवत, जयपूरवाले केसरबाईंचा - अल्लादिया खाँ हे गाणारे, नव्हते त्यांची मुलं गात होती. त्यांच्या एका मुलाचा उल्लेख साहित्यात पुष्कळ आला. मला त्यांचं ऐकायला मिळालं नाही. त्यांना मी पाहिलंही नाही. त्यांचं वर्णन गोविंदराव टेंबे आणि केशवराव भोळे यांनी केलंय. ते गिरीशांचं भावगीतही गात होते. त्याचे दुसरे सुपुत्र भूर्जीखाँसाहेब त्यांचं गाणं मी ऐकलं. इथं एक गोष्ट मला सांगावीशी वाटते, माझे गुरू शंकर केशव कानेटकर यांनी आपल्या बी.एस्सी.च्या वर्गात शिकत असलेल्या मुलाला शिक्षण सोडून द्यायला सांगून, सांगलीहून भूर्जीखाँसाहेबांकडे गाणं शिकायला ठेवलं. गिरीशांनी आपला मुलगा - मधुसूदन कानेटकर याला गाणं शिकायला ठेवलं. हे अनोखं उदाहरण आहे. गाणं शिकणं हे त्यावेळी कमीपणाचं होतं. त्यातून शास्त्रीय संगीत. त्यात गवयाला पैसेच कुठं मिळत होते? असाच काळ होता. गायकाला चाळीस/पंचेचाळीस रुपये मिळायचे, पेटीवाल्याला दोन रुपये. अशा काळात गाणारं व्हायचं. या मोठ्या घटना आहेत. मी तुम्हांला सांगितलं, त्याप्रमाणे त्या सारस्वत मुली गायला लागल्या. त्या कशा गात, त्यांचं गाणं कसं होतं, त्याचा विस्तार कसा झाला हा वेगळा मुद्दा आहे. पण श्रीमंतांच्या का होईना मुली गाणं शिकायला लागल्या. पुष्कळजण गायला लागले. एक मुद्दा इथं मला सांगायचा आहे. सर्व घराण्यांत तसे दहा टक्के राग कॉमन असायचे. बाकी प्रत्येकाचे राग वेगळे. किराणावाले, यमन गाणार, शुद्ध कल्याण, पूरिया, मुलतानी गाणार रात्री मालकंस, बिहाग, बागेश्री गाणार. जयपूरवाले - त्यांचं थोडं वेगळंच. शुद्ध राग गाणं त्यांना अपमान झाल्यासारखं वाटे. ते जोडभाई गायचे. कुठलेही दोन राग जोडल्याशिवाय त्यांना करमत नसे. हे कानडा गातात तर ते काफी कानडा गायचे. 'सुखकर आयो'. हे ललत आणि गौरी गायचे तर जयपूरवाले ललितागौरी गात. आग्रेवाल्यांचे आणखी वेगळे राग - नटबिहाग सारखे.

फैयाज खाँसाहेबांची तीन गाणी मी पुण्यात भानुविलासमध्ये ऐकली. शेरवानी आणि टोपी घातलेले फैयाज खाँ गायला बसायचे, मागे दोन चार शिष्य तंबोरे घेऊन बसायचे. गुलाम रसूल नावाचा पेटीवाला साथीला होता. मोठा सुंदर हात असलेला पेटीवाला. फैयाज खाँचा आवाज रुंद होता. त्यांच्या आवाजाला बेस होता, तो धृपद अंगाचा होता. त्यांचं गाणंही लयकारीचं होतं. ते गाणं ऐकणं हा एक वेगळाच अनुभव होता. फार सुंदर रुंद आवाज, मांडणीही तशीच सुंदर, आता 'झनझन झनझन पायल' ही आम्ही मुळात वेगळी ऐकलेली चीज त्यांच्या मांडणीत वेगळीच वाटायची. तीन चार गाणी खाँ साहेबांची ऐकली. त्यात त्यांचा 'बरवा' नावाचा राग त्यांचेकडूनच प्रथम ऐकला. 'बाजे मोरे पायलिया.' नट, नटबिहाग, ललत हे त्यांचे आवडते राग. इथंच एका दुर्दैवी गायकाची तुम्हांला गोष्ट सांगतो. त्यांचेविषयी बोलताना भीमसेन जोशीही मला त्या काळात असं म्हणत असे. 'राम, खरं कसदार गाणं काय आहे ते या माणसाकडे ऐक'. ते बेळगावचे, मुलगा वेडा झालेला. पैसे फारसे मिळत नाहीत. पण गाण्याची ताकद मोठी, प्रतिभाही चांगली. त्यांचं नाव व्ही.ए. कागलकर - व्यंकटेश कागलकर - त्यांचंही गाणं मी पुष्कळ ऐकलं. पण गाण्यामधे देखील दैव नावाची एक गोष्ट आहे. दोन सारख्या उंचीच्या गवयांना, सारखे कार्यक्रम, सारखं धन मिळेल, असं कलेमधे कधीही घडलेलं नाही. आजही घडत नाही.

हा माझा जो काळ आहे या काळात विनायकबुवांची गाणी ऐकत होतो. त्यांची गाण्याची निष्ठा फार मोठी होती. या काळात पु.ल., वसंता देशपांडे, तबला वाजवणारे मधुकर ठाणेदार, मधुकर तिसगावकर असा आमचा कंपू होता. यावेळी विनायकबुवांच्या देशभर मैफली होत होत्या. जालंदरला, कलकत्याला, देशभर त्यांना गवई म्हणून मान्यता होती. आपल्याला एक सांगतो, तुमचं काहीही मत असो. या विष्णु दिगंबर पलुस्करांच्या घराण्यातल्या लोकांनी भारतात सर्वत्र गाणं पसरवलं. भारतीय संगीताचा विचार करताना विष्णु दिगंबर पलुस्कर आणि विष्णु नारायण भातखंडे या दोन लोकांचं स्मरण केल्याशिवाय भारतीय संगीताचा विचार पूर्ण होत नाही. भातखंडे किती मोठे होते याची महाराष्ट्राला जाणीवच झाली नाही. आजही नाही. मी दोघांनाही पाहिलेलं नाही. मी त्यांच्या छायेत वाढलो. ते असताना मी गाणं ऐकत होतो. ते चौपाटीवर येऊन बसत, असे ऐकून होतो. विष्णु दिगंबर पलुस्करांचं मत असं की, लिखापढी करून

गाणं वाढतं काय? लेख लिहिला तर गाणं येतं काय? गाणं गाऊनच शिकवलं पाहिजे. भातखंडे म्हणायचे गाण्याचा तुम्ही अभ्यास केला नाही तर तुम्हांला काय गाणं येणार? या दोन्ही माणसांबद्दल सांगतो. एका मुद्द्याला आत्ताच स्पर्श करतो. भातखंड्यांनी देशभर फिरून गाण्याचे राग आणि चिजा लिहून ठेवल्या - आजही गाण्याच्या संदर्भात काही विचारायचं असेल तर भातखंड्यांच्या पुस्तकाला विचारावं लागतं. त्यांनी निरनिराळे थाट सांगितले. भातखंडे उत्तम वकील होते. बायको गेल्यावर त्यांनी वकिली सोडली. गाण्याच्या अभ्यासाकडे आपलं लक्ष केंद्रित केलं. आग्र्याला गेले. तिथं पंधरा दिवस राहिले. एका खाँसाहेबाला गाठलं. त्या खाँसाहेबाला जे हवं होतं ते देऊन त्याच्याकडून राग आणि चिजा उतरवून घेतल्या. अशा जवळजवळ अडीचशे चिजा नुसत्या लिहून घेतल्या असं नाही, त्यांना गाणंही येत होतं - ते सारं घेऊन ते मुंबईला आले. भातखंड्यांच्या चरित्रात, त्यांच्या हस्ताक्षरात त्यांनी लिहून ठेवलेलं आहे - 'पंधरा दिवस मी आग्र्याला राहिलो. पण मी ताजमहाल बघितला नाही. ताजमहाल पुन्हा जाऊन पाहता येईल पण या माणसाकडून जी विद्या मिळाली ती पुन्हा मिळेल का?' भातखंडे आणि पलुस्कर या दोघांचं ऋण मोठं आहे. पुढे रातरंजनकरानीही काम केलं. त्यांचंही घराणं पुढे आलं. मी विनायकबुवांविषयी सांगत होतो - त्यांच्याकडे गाणं देणं हे फार होतं. 'तुमच्याकडे पैसे नाहीत, माझ्याकडे फुकट राहा आणि गाणं शिका' असं म्हणायचे. असं कुणीही त्या काळात केलं नव्हतं. देशभर जाऊन गाणं शिकवून आपले विद्यार्थी त्या ठिकाणी तयार करून त्यांनाही तिथं विद्यादानासाठी तयार केलं. एक लक्षात घ्या. विष्णु दिगंबरांनी आपले शिष्य काबूल कंदाहारपर्यंत नेऊन ठेवले होते. लाहोरला गांधर्व महाविद्यालयाची सगळ्यात मोठी शाखा होती. अलाहाबादमधे कशाळकरांना नेऊन तिथं गाणं शिकवायला लावलं. बोडसांना कानपूरमध्ये विद्यालय काढून दिलं, अजून ती विद्यालयं चालू आहेत. भरभराटीला आलेली आहेत. गाण्याचा विस्तार, गाणं ऐकायला लागणं - आमच्या डोळ्यासमोर हे झालेलं आहे. आता आम्हांला ते गाणं किती आवडलं, हा अवघड प्रश्न आहे. कालपासून व्याख्यानाच्या सुरुवातीपासून मी एक शब्द वापरतोय, तुमच्या ते कितपत लक्षात आहे, माहीत नाही. व्याकरणकारांशी माझं फारसं जमलं नाही. गाणं आधी आणि व्याकरण नंतर. भाषा आधी आणि व्याकरण नंतर. आधी कुठल्याही भाषेचं व्याकरण करून नंतर बेतून भाषा सुरू होत नाही. हे गाणारे चुकीचं गात होते का? बिलकुल नाही. रागाच्या चौकटीतच गात होते. पण परफॉर्मिंग आर्टिस्टने काय काळजी घ्यायला पाहिजे, याच्याकडे त्यांचं लक्ष नव्हतं. या पूर्वी तुम्हांला सांगितलं त्याप्रमाणे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांड्यांकडे आमच्या उडाणटप्पूंची रोज संध्याकाळी मैफल भरत असे. त्यामधे मधुकर गोळवलकर नावाचा एक महाप्रतिभावान उपशास्त्रीय संगीतातला मनुष्य. त्याचा सहवास मला मिळाला. वसंत देशपांडे तिथेच भेटला. त्याच्या घराजवळ मी राहायला गेल्यावर रोज भेटी व्हायला लागल्या. पु. ल. डेक्कन जिमखाना सोडून बादशाहीच्या बोळात केतकरांच्या घरात राहायला आला होता. त्या गल्लीत गोविंदराव देसाई गोपाळ गायन समाज चालवत होते. ते नवरात्रीत नऊ दिवस गाणं करायचे. त्या गोपाळ गायन समाजातला एक प्रसंग सांगतो. माझ्या संगीताच्या प्रवासासाठी सांगतो आहे. रामराव परसटवार म्हणून एक जलतरंग वाजवणारे होते. त्यांना आमचा मधू तिसगावकर तबल्याच्या साथीला होता. त्याचा हात फार चांगला होता. वादन सुरू झालं. जलतरंग हे वाद्य सुटं असल्यानं ते वेगळं वाजायचं, त्यात मींड वगैरे काही नव्हतं. एव्हाना आपल्याला गाणं खूप समजतंय या समजुतीबरोबर आम्हीच आम्हाला संगीत इन्स्पेक्टर - तपासनीस बनवलं होतं. मग द्रुत सुरू झालं. द्रुत वादनात या परसटवारांनी लय वाढवून ठेवली. मधुकर तिसगावकर त्या द्रुत लयीत वाजवायला लागला. परसटवारांनी त्याच लयीमधे वाजवायला हवं होतं. पण तसं न करता ते सुट्टं 'टिंग टाँग' करीत बसले. मधुकरला लयही सोडता येईना. अशी लय सोडून देणं अपमान असतो. तबलजी लय सोडत नाही. दहा पंधरा मिनिटं ते चाललं होतं. आमचा मित्र घामाघूम झाला. संपल एकदाचं. संगीत इन्स्पेक्टर श्रीराम पुजारी उठले. त्यांच्याकडे गेले. त्यांची मी गचांडी पकडली. त्यांना म्हणालो, 'का हो लय वाढून ठेवलीत, त्या लयीत वाजवा ना. तबलजीचा अपमान करण्याकरता वाजवता काय?'' ते म्हणाले 'आमची अशीच पद्धत आहे.' मी म्हटलं 'आमचीही विचारायची अशीच पद्धत आहे'. आमच्या संगीत प्रवासातल्या अशाही काही गोष्टी.

पु.ल. देशपांडे याच्याकडे हा जो आमचा कंपू होता ना, त्यातले सारेच गाणंवाले होते; म्हणजे आपण गाणं जाणतो असं समजणारे. त्यांनीच भीमसेन जोशींचं पहिलं गाणं केलं - ते मीच केलं, कारण मीच भीमसेनचा मित्र होतो. भीमसेन त्यावेळी दीक्षितांच्या 'जुगार' नावाच्या नाटकात काम करण्यासाठी पुण्याला आला होता. ज्योत्स्ना भोळे राहात होत्या त्या शशीविहारच्या बोळात, रा. श्री. जोगांच्या घराशी भीमसेनला खोली घेऊन दिलेली होती. त्यावेळी भीमसेन महाराष्ट्रात गवई म्हणून प्रसिद्ध नव्हते. त्यावेळी बसवराज राजगुरू, मल्लिकार्जून मन्सूर, गंगूबाई हनगल हे मोठे आणि प्रसिद्ध गवई होते. गुर्टू - शोभा गुर्टूचे सासरे - सतारिये होते. या काळात विनायकबुवा पटवर्धन आणि नारायणराव व्यास - जास्त करून विनायकबुवा - या आमच्या कुटाळकंपूत विनायकबुवांची टवाळी चालायची. मी विनायकबुवांच्या गाण्याला जायचो - हे इतर कोणी जायचे नाहीत.

या संदर्भातला आणखी एक दुवा सांगण्यासारखा आहे. त्या काळातला हा मुद्दा कृपा करून लक्षात घ्या. त्या ज्या जुन्या चिजा होत्या. त्यांचा सबंध अर्थ कुठल्याच गायकाला माहीत नसे. त्याची त्यांना कधी गरजच पडत नव्हती. त्या काळात महंमदशहा नावाचा मुसलमान बादशहा होता, बादशहाला खूष करण्याकरिता त्या चिजा लिहिलेल्या होत्या. त्याचं तोंड मिळालं की बाकी काही माहीत नाही. पन्नास पंचावन्न पर्यंत मी पाहिलं, काय चिजा होत्या? 'तू है महंमदसा' - अशी चीज होती. 'हे महंमदसाहेब तूच आहेस. दुसरं कोणी नाही. या तरी चिजा सदारंग - अदारंगांनी का लिहिल्या? सदारंग - अदारंग हे मूळचे मुसलमान गवई, चांगले बुद्धिमान. धृपद सोडून ख्याल गातात, म्हणून त्यांना राज्याच्या बाहेर हकलून दिलं होतं. विष्णु दिगंबरांनी त्याच चिजांच्याऐवजी संतांचे अभंग घेतले. त्यांनी सूरदास तुलसीदासांच्या रचनांवर एकेक राग फिट केले.

एक नेहमी लक्षात ठेवा, ज्यावेळी धृपद होतं त्यांनी ख्यालाचा दुस्वास केला. पुढे ख्यालाला प्रतिष्ठा आली त्यावेळी त्यांनी ठुमरीचा

दुस्वास केला. ओंकारनाथ ठाकूर म्हणायचे. 'हम क्यो ठुमरी गाए, हम क्या तवायफ है? हम भजन गाते है'. ते भजन गायचे. ठुमरी भजनात लपवून गायचे. ठुमरी गाणारे 'गझल, भजन क्या गाना है?' असं म्हणायचे, दर काळात अशी शिडी होती. हे बरोबर नाही. प्रत्येक गाणं हे एकाच योग्यतेचं आहे. चांगला गझल गाणारा वाईट ख्याल गायकापेक्षा श्रेष्ठ आहे. हे गाणं ऐकून कळायला पाहिजे. मी जो मुद्दा सांगत होतो की, चिजांचा अर्थ न समजता त्या गायल्या जात. दरबारी कानडामधील चीज - प्रसिद्ध चीज, 'मुबारकबादियाँ' आमचे भीमसेन खुलवून म्हणायचे. समोरचेही चिजेनं राग ओळखायचे. गायकही मी ही चीज गातच आहे असं सांगायचे. ह्या कंपूला अमीरखाँचं गाणं आवडायचं नाही आणि मी त्यांच्या गाण्याचा प्रेमी. पुल मला म्हणायचा 'काय राम, हा चार सुरांसाठी पाच तास वाया घालवतो.' हे बघा, गाणं न ऐकण्याचे रसिक होते त्यात पु.ल. होता. विनायकबुवांचंही गाणं न आवडणारे होते. त्यांच्या गाण्यात रंग नाही. इथं व्याकरणकार आणि परफॉर्मिंग आर्टिस्ट याचा संबंध, दोन्ही आहे. विनायकबुवा कसे होते? त्यांना जसं शिकवलं तसे गात होते तसं तेच पुढच्यांना ते देत होते. त्यांचे अनेक शिष्य कर्तबगार होते. दिल्लीचे गांधर्व महाविद्यालय चालविणारे विनयचंद्र मौद्गल्य हे त्यांचे शिष्य. दिल्लीला आज जे गाणं पसरलंय ते विनयचंद्र यांच्यामुळेच.

ज्या चिजा त्या काळी गायल्या - 'मुबारकबादिया तोहे लाख लाख शादियाँ' महंमद खाँ ला उद्देशून म्हटलेली ही चीज विष्णु दिगंबरांना कशी चालणार, त्यांनी त्यात वेगळा मार्ग काढला. पूरिया धनाश्रीमधली एक चीज अनवधानानं गेली दोनशे वर्षे गवयी गात होते. सांगायला थोडं अशिष्ट असलं तरी मुद्दा स्पष्ट करण्याकरता सांगतो. चीज आहे 'अब तो मैं ऋतुमानी' महंमदशाला त्याची ती स्त्री सांगत आहे. 'मी ऋतुस्नात आहे. तू माझ्याजवळ येऊ नको.' ही चीज आमचे भीमसेन जोशी कसून गायचे. एकटे भीमसेन गात होते असं नाही. अब्दुल करीम खाँ पासून सगळे गात होते. हा अज्ञानाचा भाग आहे. हे घालवून टाकण्यासाठी, हे शुद्ध ब्राह्मण - त्यामुळे लगेच त्यावर गोमूत्र शिंपडून त्या चिजा शुद्ध करून घेतल्या. काय चिजा केल्या? रामाचं वर्णन, कृष्णाचं वर्णन. बरं, आपल्याकडे तेहतीस कोटी देव असल्यामुळं वर्णनाला काही कमतरताच नाही. मग चिजा अशा आल्या - 'अनोखा लाडला, खेलन माँगे चाँद' हे सूरदासाचं घेतलं आणि विनायकबुवांना त्यांच्या गुरूंनी शिकवलं. या बरोबरच एक मोठा विचार मांडला गेला तो मध्यलयीचा - हे सगळं मध्य लयीत आणलं. मध्य लय ही गाण्याची मोठी बाजू हे अमीरखाँ आणि कुमारगंधर्व यांनी पुढं समजावून दाखवलं. ह्याच चिजेचं - विनायकबुवांनी त्यांच्या पदरात जो राम टाकला गेला, त्यांनी आपल्या पद्धतीनं त्यांचं परिपोषण केलं. त्याचं वेगळंच रूप मांडलं. (गातात) 'अनोखा लाडला..' त्यांच्या आतून ते वेगळं आलं. त्यामुळेच या उडाणटप्पू कंपूला ते आवडत नसे. फार अशुभ विनोद देखील त्या काळात झाले. वसंत देशपांडेचे दोन गुरू अमानत अली खाँ आणि सुरेशबाबू माने महिन्याभराच्या अंतराने गेले. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे वसंताला म्हणाले, 'वसंता हे पाचशे रुपये घे आणि त्या अमूक गवयाकडे जाऊन त्याचा गंडा बांध म्हणजे इजा, बिजा आणि तिजा होईल'. खट्याळपणाची देखील एक वेगळी बाजू - विनायकबुवा भजन म्हणायचे. (गातात) 'मै गिरीधर आगे नाचूंगी ... यातल्या काही गोष्टी कोणाला आवडायच्या नाहीत पण त्यांनी गाण्याकरता जे केलं, त्यांनी केलेलं जे काम आहे त्याच्याकडे डोळस दृष्टीनं बघितलं पाहिजे असं मला वाटतं.

पुण्यात शिवाजी मंदिरात याच काळात गजाननराव वाटवे यांनी भावगीत हा प्रकार सुरू केला. भावगीताविषयी काही भाग मी काल सांगितलेला होता. पूर्वी एक कॉलरचा सदरा होता - तो सदरा, पँट, बाजाची पेटी. 'आता मी तुम्हांला एक गाणं म्हणून दाखवणार आहे, भावगीतालाच मी गाणं म्हणतो - कृपा करून शांतपणे आपण ऐकावं. कवितेचे कवी माधव ज्युलियन, नाव 'आईची आठवण' अशा प्रस्तावनेनंतर ते सुरुवात करायचे (नक्कल करून गातात) मी तुम्हांला सांगतो, यात थोडीसुद्धा अतिशयोक्ती नाही. त्यांचं गाणं समकालीन सिनेमातलं गाणं होतं. ते गाणं त्याची लय आज ऐकवली तर हास्यास्पद वाटेल. त्यावेळी संबंध आयुष्य स्वस्थ होतं. रावसाहेब ऑफिसला निघालेत आणि मांजर आडवं आलं तर परत घरी येऊन अर्धातास विश्रांती घेऊन पुन्हा ऑफिसला जायचे. कुणी विचारणारं नव्हतं त्यावेळी. अशा वेळी 'बालम आन बसे मोरे मन मे' हे गाणं कॉलेजची तरुण मंडळी हातामध्ये पुस्तकं घेऊन - कारण हातात पुस्तक असल्याशिवाय कॉलेजमधे आहेत असं वाटायचं नाही. ते पुस्तकही ठरलेलं. कुसुमाग्रजांचं 'विशाखा', फडक्यांच्या कादंबऱ्या, वाटवे, कुरवाळीकर यांची गाणी, असा तो काळ होता. 'आई म्हणून कोणी, आईस हाक मारी...' सगळं भावुक. आम्ही हेही सगळं ऐकायला जात होतो. बालगंधर्वांची गाणी होत, तीही ऐकायला जायचो.

याच वेळी भीमसेन जोशीचं पहिलं गाणं पु.ल. देशपांडेंच्या घरी मी केलं. तो माझा मित्र. पु.ल. ची आणि त्याची गाठ एक-दोनदा रेडिओ स्टेशनवर पडलेली, इतकाच परिचय. त्यावेळी तो कानडी नाटकातून गायकाची भूमिका करणारा. भीमसेनचं गाणं झालं. एकोणीसशे एकोणपन्नास - पन्नास सालचे भीमसेन, सत्तर सालचे भीमसेन, नव्वद सालचे भीमसेन आणि दोन हजार चार सालचे भीमसेन हे चतुर्मुखी भीमसेन आहेत. त्यावेळेला ते कसे गात असत? हा पॅटर्नच वेगळा आहे.

सन पंचावन्न ते सत्तर या काळामधे भारतीय संगीताचा उत्तमोत्तम प्रसार व्हायला लागला असं आपल्याला दिसायला लागेल. पुण्यामधे ही सगळी मंडळी येऊन गायला लागली. मुंबईत मी गाणं ऐकायला जायला लागलो. माधवबाग हे माझं गाणं ऐकायचं ठिकाण. तिथं गाणी व्हायची. हिंदुस्थानातले तबलिये तिथं ऐकायला मिळायचे. तबल्यातलं मला विशेष कळत नव्हतं. आवडत होतं. त्यामुळे थोडंसं कळायला लागलं होतं. गालेखाँ नावाच्या माणसाची पुण्यतिथी व्हायची. बनारसचे तबलजी यायला लागले, पंजाबचे तबलजी यायला लागले. थिरखवाँसाहेब, अमीरहुसेन खाँसाहेब होते, मुंबईतच 'कल्याण बिल्डिंग'मध्ये. किराणा घराण्याची गायकी गात होते, त्यांना कुणी विचारत नव्हतं. ते दर्जीचं काम करीत होते आणि मग गायचे असा काळ. ते एक असेच तानांचे बळी. विलक्षण तान. ते जोडीनं गात. युगलगान. हे पन्नास सालापासून वाढलं. त्याचे गुणदोष पाहिले पाहिजेत. युगलगान अर्थातच दोघं मिळून गायचं. पहिलं युगलगान आम्ही

ऐकत होतो धृपदियांच्याकडे. ते दोन भाऊच असायचे. चांगलं गायचे. मांडणी चांगली असायची, विस्तार चांगला असायचा. स्वराचा भरणा चांगला असायचा. लयीचं अंग फार मजेशीर असं होतं. आम्ही जे ऐकलं ते तृप्त होणारं असं धृपद. त्यांना अठरा जन्मांची देन होती. राग गाणार नाही. धृपदच गाऊ. संगीतामधे हे जे एकलेपण आहे ते फार दुरून आलेलं आहे असं दिसून येईल. धृपद ऐकत होतो. कव्वालीही ऐकत होतो. त्या कव्वालीच्या काळात दोन हिंदी कव्वाल, पुष्कळ लोकांना ते नाव एकाचंच आहे असं वाटायचं. ते दोन भाऊ होते. त्यांनी जी कव्वाली नवीन प्रकारानं मांडली - कव्वालीमधे लयीचा भाग आहे, टाळ्या वाजवतात हे ठीक आहे; पण कव्वालीमधे गाणं शंभर वर्षांपासून चालत आलेलं आहे. काही कव्वालांचे आवाज, त्यांची मांडणी - हे बघा, कव्वालांना, तो बरोबरचा तयारीचा माणूस आहे ना, तो मूळ कव्वाल गात असताना चार मात्रांची फार झालं तर आठ मात्रा एवढीच जागा मिळायची तेवढ्यात ते ती जागा आपल्या ताकदीनं भरायचे. हे कव्वालांचं मोठेपण. त्या हिंदू कव्वालांचं नाव शंकर-शंभू. शंकर एक शंभू एक. शंभू आहे. शंकर अपघातात गेला. या शंकर-शंभूची कव्वाली ऐकणं म्हणजे क्लासिकल मैफल ऐकण्यासारखं होतं.कव्वालीत दोन भाग आहेत. धर्माविषयी कव्वाली आहे. अल्लाची प्रार्थना, त्याला नापिया कव्वाली म्हणतात आणि श्रृंगार वगैरे इतर रसांचा परिपोष करणारी कव्वाली वेगळी. आपल्याला चित्रपटातल्या कव्वालीचं उदाहरण देतो. 'आहे न भरी शिकवे न किये..' ही तिघांनी म्हटलेली कव्वाली. त्यात जोहराबाई अंबालावाला नावाची कसदार आवाजाची गायिका होती. त्या बाईनं आमचे ऐकण्याचे कानच उपटले असं म्हटलं पाहिजे. याच सुमाराला 'रतन' नावाचा पंजाबी सिनेमा आला. तो रतन आल्याबरोबर इकडचं सगळं संगीतच उधळून गेलं. गुलाम महमद या संगीतकारानं लाहोरचं जे पंजाबी संगीत इकडं आणलं, त्यामुळे आपला संगीताकडे बघण्याचा दृष्टिकोन विस्तारित झाला, बदलला किंवा जुन्याला मारक ठरला. उशीराची लय त्यांनी नाहीशी केली. असं आता नाही चालणार. 'वारा फोफावला' आलं, त्याला आपण सर्वांनी छान म्हटलंय, त्यात मीही होतो. ही त्या काळातली आपली लय होती. केशवराव भोळेही त्याच लयीत संगीत देत होते. फक्त ते तांब्या वाजवत होते एवढाच फरक. 'दहा वाजता' मधली गाणी आपण ऐका. - त्याच सुमाराला रात्री लाहोर रेडिओ ऐकणं हा मला छंद लागला. हा ४२-४३ पासूनचा काळ आहे. लाहोरचा रेडिओ ऐकायचा आणि शेरलॉक होम्स, स्टीफन्स वाइल्ड, अर्ल स्टोनर यांच्या सहवासात तो वेळ घालवायचा.

उमराठिया बेगम म्हणून गाणारी होती, तिचं गाणं मला फार आवडायचं. नुकतीच ती वारली. तिचं एक प्रसिद्ध गाणं होतं त्या 'अभी तो मैं जवान हूँ' या एका रेकॉर्डनं संबंध हिंदुस्थान हलवून नेलं... हबीब जालंदरीची ही कविता.

माझ्या आयुष्यात आणखी एक गायक भेटले, त्यांच्या आयुष्याच्या शेवटापर्यंत मी त्यांचा भक्तच राहिलो. त्यांचं नाव - बडे गुलाम अली खाँ साहेबांचे बंधू बरकत अली खाँ साहेब. आत्ता जसं तुम्ही सांगाल की, आम्ही लता मंगेशकरांचं गाणं ऐकलंय. तसं मी त्यांच्याबरोबर बसून त्यांचं गाणं ऐकलंय. इतकं मोठेपण त्या माणसाचं होतं. त्यांची एक रेकॉर्ड निघाली होती. (गातात) 'बागों में पडे झूले झूऽऽले रे झूले, झूले तुम भूल गये हमको हमको ...' हे मी तुम्हांला गाऊन दाखवतो आहे, याच्या हजारपट चांगलं करा म्हणजे बरकत अली. मी हिमालयाच्या पायथ्याशी आहे आणि ते गौरी शंकर होते. अर्धा सदरा, पायजमा, असा साधा पेहराव. संतासारखा मनुष्य. बडे गुलाम अली खाँनी धाकटा भाऊ म्हणून त्याला पेटीवाला बनवलेला. ते पाकिस्तानातच राहिले, हे इथं आले. पण स्वभाव इतका उमदा की आपण एखादी शंका विचारावी. 'खाँ साहेब ये क्या बात है कुछ समझ नहीं आती' लगेच ते सांगायचे 'अरे... ' लगेच सुरू - काय सांगू तुम्हांला. मी असं ऐकलंय की ठुमऱ्यांमधे ब्राह्मणांची पोरं फार दंगा करायची. पुढे ती सभ्य झाली की नाही हा इतिहासाचा विषय आहे. (गातात) 'बमन का छोरा, कंकर मार जगाये' कंकर म्हणजे छोटा दगड, हे 'कंकर' इतक्या ठिकाणी आलेले आहेत, त्याचा अर्थ गायकांनाही कळलेला नाही. चिजांमधे जे कंकर आहे, चिजांमधे सगळे गायक - कंकर हा शब्द, कंकर पासून झाला कांकरिया - गायकांमधे सगळे चिजा कशा म्हणत? 'लंगर का करिये जिन मारो' असंच सगळे म्हणतात. मास्तर असल्यामुळं शुद्धलेखन तपासणं हे आमचं काम आहे. हे काय आहे लंगर, ते आम्ही शोधलं. नव्व्याण्णव टक्के लोकांना लंगर काय हे माहीत नाही. अहो लंगर म्हणजे लंगडा म्हणजे कृष्ण. ती मूळची चीज अशी 'लंगर कांकरिया न मारो' 'हे लंगड्या, (कृष्णा) खडे मारू नकोस' त्याचं काय झालं 'लंगर का करिये जिन मारो' या 'जिन मारो' ला काही अर्थ आहे? का हे गायकांना सांगितलं तर ते म्हणतात 'असेल असं, पण आम्हांला गुरुजींनी असंच सांगितलं, आम्ही तसंच म्हणणार' भीमसेनची आणि आमची जिवलग मैत्री - 'भीमण्णा तू असं नको म्हणू असं म्हण' तो म्हणायचा 'हे बघ तू त्रास देऊ नको. कोण ऐकतंय? कुणाला कळतंय आणि मला तरी कुठं कळतंय आणि कळून तरी काय करायचंय?' शेवटी तो रागावून मला म्हणाला, 'तुझ्या घरच्या पोस्टाचा पत्ता दे, तो देखील मी तुला गाऊन दाखवतो. पण तुझं शहाणपण मला नको...' हे घडलं कसं? भीमण्णाची तीन मिनिटांची एक रेकॉर्ड निघाली - शुद्ध कल्याणमधली - 'बतिया तोरा' या बतिया तोराचा काही अर्थच लागेना. याला विचार, त्याला विचार - कुणालाच माहीत नाही. आमचा खो खोचा खुंट म्हणजे कुमारगंधर्व. मला त्यानं विचारलं. 'काय रे सोलापुऱ्या, काय काढलंस' मी त्याला म्हणालो 'हे बतिया तोरा' हे काय आहे ते सांग ना! तो म्हणाला 'काय आहे?' मी म्हणालो 'तेच तर मी विचारतोय'. त्यांनी मग शोधून सांगितलं. ती मूळची चीज होती - 'बतियाँ दौरावत है' बतियाँ म्हणजे बोलणं, दौरावत म्हणजे वाढणं, 'बोलणं वाढत आहे' अशी चीज. भीमण्णाला सांगून पटेना, तो म्हणाला 'काय असेल ते कुमारला सांग. त्याला पाहिजे तर तसं गाऊ दे' गाण्यामधे चिजांची शुद्धी, त्यांचा अर्थ - पुष्कळ चिजा पंजाबी आहेत. आपल्याला मराठी नीट येत नाही तर पंजाबी काय येणार ? 'लेण्ड टैण्ड दैण्ड टैलो' काय कळणार यातलं - असा सगळा प्रकार होता.

पुण्यामधे भीमसेन जोशींचं जे पहिलं गाणं झालं त्यावेळी त्यांनी जो मिया मल्हार गायला - ही गोष्ट पु.ल. देशपांडेच्या, जिमखान्याच्या घरी, जिमखान्याची टेनिस कोर्ट आहेत त्याच्यापुढे नाईकनिंबाळकरांच्या घराच्या पलिकडे तो राहायचा, पहिल्या मजल्यावर, तिथं ते

गाणं झालं. त्या गाण्याला माझे गुरू द. रा. बेंद्रे होते कारण त्यांच्यामुळेच तो दीक्षितांच्या नाटकात काम करायला आला होता. त्याबरोबरच शाहू मोडक हेही आलेले होते. 'आमचा ग्रुप तर होताच. पन्नास वर्षांत एखाद्या रागाची आठवण राहाते, तशी त्या मिया मल्हाराची आठवण. भीमसेन जोशींचा मिया मल्हार हा आवडता राग. पन्नास ते साठ या काळात सगळे गवई ठराविक राग गात असत. 'गळ्यावर चढलेला राग आहे', असं सांगायचे. भीमसेनच्या पुढे खूप मैफली व्हायला लागल्या, एकोणीसशे चौपन साली त्याचा देशात उदय झाला. पहिलं गाणं कलकत्त्याला झालं. त्यामुळे भीमसेन जोशी हे देशाचे गवई व्हायला सुरुवात झाली. - मी सांगत आहे तो जो मिया मल्हार झाला, त्याला मधुकर गोळवलकर सारंगीला होते, मधुकर ठाणेदार हे तबल्याला होते, वसंत देशपांडे काही काळ हार्मोनियमवर होते. पी. अेल्.ही काही काळ हार्मोनियमवर होते. पण भीमसेनच्या ताना आणि पु.ल.चं. वाजवणं - पुलही चांगलं वाजवायचा. पण गंमत सांगतो, मिया मल्हार मांडत असताना ज्यावेळी द्रुत चिज सुरू झाली - म्हणजे आलाप झाले - बोलतान झाली, गमक झालं, तानांचा पहिला भाग झाला आणि द्रुतमधे आता शिरणार - इतक्यात प्रचंड प्रमाणात पाऊस पडायला लागला. अभूतपूर्व पाऊस. गारा पडत आहेत की काय असं वाटतं होतं. म्हणजे तो बाहेरचा आवाज आणि आत हा खोलीतला भीमसेनचा आवाज - पुढे गंमत अशी झाली, आयुष्यात असं एकदाच होत असेल असं वाटतं. भीमण्णा गमकाच्या अंगानी 'घुमंड घुमंड कर आयी बदरिया... बरसन', असं म्हणायला लागल्यावर कडाकडा वीज चमकायला लागली. - ओऽगॉड! म्हणजे तो मिया मल्हार मोठा की हा मिया मल्हार मोठा, असा प्रश्न पडला. आयुष्यात मी मिया मल्हार खूप वेळा ऐकला पण सगळ्यांच्या अंगावरती शहारे आलेला तो मिया मल्हार होता. पुढे भीमसेन अशा ताना मारायला लागले की आम्हांला वाटायला लागलं, या जीवघेण्या ताना यांनी घेऊ नाही. जिवाच्या आकांतानं ते गायला लागले. तो मिया मल्हार थांबला - पुढे अर्धा तास सन्नाटा जो म्हणतात तो पसरला - आमच्या गाण्यात सन्नाटा नावाची एक गोष्ट आहे. म्हणजे काय? एखादी चांगली गोष्ट घडून झाली की टाळ्या नाही - काही नाही - गप्प बसून राहतात - कारण आपण जे गाणं ऐकलंय त्याच अनुभवात ते बुडून गेलेले असतात. असा सन्नाटा पसरला. शेवटी भीमण्णाच म्हणाला, 'अरे, काही तरी बोला की रे!' असा तो मिया मल्हार. मला 'आयुष्यातल्या संस्मरणीय दहा मैफली सांगा' असं सांगायला सागितलं तर माझ्या सत्तर वर्षांच्या गाणं ऐकण्याच्या प्रवासातल्या भीमसेनच्या दोन तीन मैफली सांगेन, त्यांतला एक हा 'मिया मल्हार'.

सवाई गंधर्व पुण्यतिथी सुरू झाली. आम्ही भीमसेनचे मित्र असल्यामुळे मदतीला होतोच. त्यावेळी पुण्यतिथी लक्ष्मी क्रीडा मंदिराच्या हॉलमधे व्हायची. कोणाही कलाकाराला बिदागी दिली जात नव्हती. तिथं येऊन 'सेवा करायची' अशीच भावना होती. आम्ही पाचशे रुपये गोळा करायचो. नानासाहेब देशपांडे पाचशे घालायचे आणि सवाई गंधर्व पुण्यतिथी व्हायची. आणखी एक सांगतो, पुष्कळ टीकाकारांनी न कळता लिहिलेलं आहे म्हणून सांगतो. सवाई गंधर्व पुण्यतिथी ही भाद्रपद महिन्यात येत असे. रामभाऊ कुंदगोळकर, अविधवा नवमीच्या दिवशी वारले. म्हणून ही पुण्यतिथी पहिली चार पाच वर्ष भाद्रपद महिन्यात येत असे. ही जिथे आयोजित केली जात असे त्या हॉलला वरती पत्रे होते. मी हे सांगतोय, त्या वर्षीच्या पुण्यतिथीला, नऊ वाजल्यापासून पाऊस पडायला लागला. आत जे गात होते त्यांचा आवाजही ऐकायला येईनासा झाला. हिराबाई गायल्या. मी आपल्याला सांगतो, पहिली सात-आठ-दहा वर्षं, न चुकता हिराबाई येऊन गायच्या. छोटूताई - सरस्वतीबाई गायच्या. संगमेश्वर गुरव येऊन जायचा. बसवराज एक दोनदा गायलाय - भांडून नंतर येईनासा झाला. फिरोज दस्तुर यायचा - नव्वद टक्के किराणेवाले येऊन गायचे. एक राग गाऊन उठायचे. ती काही मैफल नव्हती. रात्रभर गाणं पडत गेलं.या रपरप पावसाच्या आवाजापुढे गाणं कसं ऐकणार - असं होता होता चार वाजता पाऊस थांबला आणि ४। /४॥ च्या सुमाराला भीमसेनजी गायला बसले. विलक्षण उकडत होतं. बाहेर पाऊस रिमझिम झाला होता पण आत प्रचंड उकडत होतं - पी एल समोर बसलेले आणि भीमसेननी 'रैन का सपना' हा ललत राग गायला सुरुवात केली. पहिल्या दहा मिनिटांतच त्यांनी संबंध मैफलीवर कब्जा मिळवलेला होता. 'रैन का सपना' सुरू झालं. त्यानं त्या दिवशी अशी आलापी केली की 'ललत' हा राग समुद्रासारखा मोठा आहे अशी आमची भावना होत गेली. 'अरे हे 'ललत मधे आहे का? हेही ललत मधे आहे का?' असं मनात येत होतं. बढत केली. गमक, बोलताना झाल्या. काही सरगम केली - इथं थोडं बाजूला जाऊन सागंतो, आजकालच्या गाण्यात काही गाणाऱ्यांकडून ही विनाकारण सरगम त्रासदायक झालेली आहे. काही गायक ठरवून म्हणजे नाटकासारखं, लय ठरलेली, तबलजीचे बोल ठरलेले - मी संगीत ऐकत आहे त्या आरंभीच्या काळापासून सांगतो, मूर्ख टाळ्या वाजवणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. - तो जो ललत झाला तो दहा सव्वादहाला संपला. देहभान हरपूर गेलेला ललत. मला सत्तर वर्षांतला एकच राग सांगा म्हटलं तर त्या दिवशीचा ललत असं मी सांगेन. पु.ल., मी, प्रभाकर पोतदार, य. दि. फडके, वसंत शिरोळकर, असे सारे मित्र, सारे सुन्न होऊन बसलो होतो. हा जो ललत ऐकला तो म्हणजे - मला धर्मातलं काही कळत नाही - पुजारी असलो तरी गाण्याला वाहिल्यामुळे तिकडे गेलो नाही - पण ओंकाराचं महत्त्व अलिकडे लोक फार सांगायला लागले आहेत. पूर्ण गाणं ऐकून तृप्त होणं म्हणजे ती समाधी आहे असं मी मानतो. ती समाधी त्या दिवशी भीमण्णांनी आम्हांला सगळ्यांना दिली.